शनिवार दि. ०६ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# निलंबनाची पार्श्वभूमी तरीही प्रभारी पदाची मेहेरबानी; परतूरच्या बीडीओंचा कारभार चव्हाट्यावर

## १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत ३० ते ४० टक्के कमिशनचा संशय; चौकशीची मागणी!

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर जिल्हा जालना येथील पंचायत समितीचा कारभार सध्या पूर्णपणे रामभरोसे चालला असून, येथील गटविकास अधिकारी () राजेश तांगडे यांच्या मनमानी, बेकायदेशीर आणि भ्रष्ट कारभारामुळे तालुक्यातील जनता कमालीची त्रस्त झाली आहे. तांगडे यांच्या विरोधात जिल्हा परिषद जालना आणि विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे अनेक तक्रारी दाखल होऊनही कोणतीही ठोस चौकशी होत नसल्याने, अखेर वंचित बहुजन आघाडीने या भ्रष्ट कारभाराविरोधात थेट रणशिंग फुकले आहे. या संदर्भात विभागीय आयुक्तांना थेट निवेदन देऊन तात्काळ चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

**निलंबनाची पार्श्वभूमी असतानाही कृपादृष्टी का?**

मिळालेल्या माहितीनुसार, राजेश तांगडे हे दि. ३/१२/२०१६ ते ११/३/२०२६ या कालावधीत प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना, विहिरींच्या कामातील बेकायदेशीर व भ्रष्ट कारभारामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांना निलंबित केले होते. असे असतानाही, दि. १९/६/२०२४ पासून आजतागायत त्यांना पुन्हा त्याच प्रभारी गटविकास अधिकारी पदावर कशाच्या जोरावर बसवण्यात आले, असा तीव्र सवाल उपस्थित होत आहे. कनिष्ठ पदावरील व्यक्तीला वर्ग-१ चा पदभार देता येत नाही आणि दिला तरी तो तात्पुरत्या स्वरूपाचा असावा लागतो. मात्र, तांगडे यांना या पदावर कायम ठेवून भ्रष्ट निर्णय घेण्याची मोकळीक दिली गेल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**घरकुल लाभार्थ्यांची अडवणूक; तहसीलदारांचे आदेश डावलले!**

शासकीय धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. यासाठी परतूर तहसील कार्यालयाने गटविकास अधिकारी राजेश तांगडे यांना वारंवार लेखी व तोंडी पत्रव्यवहार केला, चार वेळा स्मरणपत्रे पाठवली. मात्र, तांगडे यांनी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. पावसाळा तोंडावर आलेला असतानाही अद्याप लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालयात सादर केलेली नाही. वरिष्ठांचे आदेश टाळणे आणि गरिबांना वेठीस धरणे हा येथील नित्याचाच कारभार झाला आहे.

**निवेदनातील प्रमुख धक्कादायक आरोप:**

विभागीय आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनात पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराचे खालील वाभाडे काढण्यात आले आहेत:

तक्रारदारांची अडवणूक: ग्रामपंचायतींमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारी करणाऱ्या सरपंच किंवा नागरिकांना न्याय देण्याऐवजी सत्ताधारी गटाशी संबंधित आरोपींना पाठीशी घातले जाते.

माहिती अधिकाराचा संकोच: अनेक नागरिकांना माहिती (पान २ वर)

# जलसंवर्धन ही काळाची गरज; युवकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी अशीमा मित्तल

**जालना- प्रतिनिधी**

माय भारत, जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'जलदिंडी अभियानाचा' समारोप जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पाडळी (ता. बदनापूर) येथे उत्साहात संपन्न झाला. दि. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानाद्वारे जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पर्यावरण



संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जलदान करून आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी पाथ्रीकर कॅम्पसचे संचालक डॉ. देवेशजी पाथ्रीकर होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, तहसीलदार अतुल बने, डॉ. रामदास निहाळ (पान २ वर)

# देवस्थान इनाम जमिनींचे खाजगीकरण थांबवा; प्रस्तावित अधिनियम तात्काळ रद्द करा

## देवस्थानांच्या उत्पन्न स्रोतांना स्वतंत्र कायदेशीर संरक्षण देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या ''महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६'' या प्रारूप कायद्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जालना जिल्हाध्यक्ष डॉ. निसार अहमद देशमुख यांनी तीव्र हरकत नोंदवली असून, हा अधिनियम तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील अनेक प्राचीन मंदिरे, मठ, दर्गे आणि विविध देवस्थाने यांच्या दैनंदिन कारभाराचा मुख्य आधार



देवस्थान इनाम जमिनींचे उत्पन्न आहे. या उत्पन्नातून पूजा-अर्चा, वीज बिल, स्वच्छता, अन्नदान, महाप्रसाद, यात्रोत्सव, वेदपठण, वारकरी सेवा तसेच गरीब व गरजू भाविकांना मदत यांसारखे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे की, प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थानांच्या मालकीच्या इनाम जमिनींचे निर्मूलन झाल्यास अनेक धार्मिक संस्थांची आर्थिक घडी विस्कळीत होऊन त्यांचे अस्तित्वच धोक्यात येईल. परिणामी हजारो वर्षांची धार्मिक व सामाजिक परंपरा उद्ध्वस्त होण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

**अतिक्रमण व व्यापारीकरणाची भीती**

या कायद्यामुळे देवस्थानांच्या जमिनींवर अतिक्रमण, अनधिकृत हस्तांतरण आणि व्यापारीकरण वाढण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भविष्यात या जमिनी सर्वसामान्य शेतकरी किंवा भाविकांच्या हिताऐवजी आर्थिकदृष्ट्या बलाढ्य घटकांच्या ताब्यात जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**राज्यघटनेतील अधिकारांवर गदा**

भारतीय राज्यघटनेतील कलम २५ आणि २६ नुसार धार्मिक संस्थांना त्यांच्या धार्मिक (पान २ वर)




# कडक उन्हात सुद्धा पारंपारिकतेचा साज ठेवून, आधुनिकतेची जोड देऊन गृहिणी घर कामाच्या लागणाऱ्या वस्तू बनवण्यात दंग

**दत्ता देशमुख**

चैत्र-वैशाखाचा कडक उन्हाळा सुरू होताच ग्रामीण भागातील घराघरांतून सांडगे, पापड, कुरडया, शेवया करण्याची लगबग सुरू झाली आहे. वर्षभर पुरेल इतका साठा करून ठेवण्यासाठी महिला वर्ग पहाटेपासूनच कामाला लागला आहे. घराच्या गच्चीवर, अंगणात पांढऱ्या शुभ्र पापडांच्या, लाल मिरचीच्या सांडग्यांच्या रांगा दिमाखात उन्ह खाताना दिसत आहेत.

**उन्हाळा म्हणजे वाळवणाचा हंगाम**

एप्रिल-मे महिन्यातील कडक ऊन व कोरडे हवामान हे सांडगे-पापड, कुरडया, शेवया, लोणची वाळवण्यासाठी पोषक असते. त्यामुळे या काळात ग्रामीण व शहरी भागातील महिला वर्षभराच्या भाजीची सोय म्हणून हे पदार्थ मोठ्या प्रमाणावर तयार करतात. ''उन्हाळ्यात केलेले सांडगे-पापड वर्षभर टिकतात. पावसाळ्यात भाजी मिळाली नाही की हेच कामी येतात,'' असे टेंभुर्णी येथील गृहिणी सुनिता काकडे यांनी सांगितले.

**पारंपरिक पद्धतीला आधुनिकतेची जोड**

पूर्वी फक्त घरापुरते सांडगे-पापड केले जात. मात्र आता अनेक महिला बचतगटांनी याला व्यावसायिक स्वरूप दिले आहे. उडीद पापड, तांदळाचे पापड, नाचणीचे पापड, ज्वारीचे पापड, बटाटा पापड, साबुदाणा पापड, गव्हाच्या कुरडया, मिरचीचे सांडगे, गव्हाचे सांडगे, मूग डाळीचे सांडगे असे विविध प्रकार बाजारात विक्रीसाठी तयार केले जात आहेत.

जाफ्राबाद येथील 'माऊली महिला बचतगट'च्या अध्यक्षा सविता पाटील म्हणाल्या, ''आमच्या गटातील २० महिला मिळून दररोज ५० किलो पापड लाटतो. १५ दिवसांत ५ क्विंटल माल तयार होतो. थेट ग्राहकांना व आठवडी बाजारात विक्री करतो. महिलांना घरबसल्या ८ ते १० हजार रुपये महिना मिळतो.''



**साहित्य महागले तरी उत्साह कायम**

यंदा उडीद डाळ, मूग डाळ, ज्वारी, तांदूळ, तेल, मिरची, जिरे, हिंग यांच्या किमती वाढल्या आहेत. १०० रुपये किलोची उडीद डाळ १४० रुपयांवर गेली आहे. तरीही महिलांचा उत्साह कमी झालेला नाही. ''महागाई वाढली तरी घरचे खाणे चविष्ट व शुद्ध असते. बाजारच्या पापडापेक्षा घरचा पापड बरा,'' असे देऊळगावराजा येथील आशा ताई सांगतात.

**पापड-सांडगे करण्याची प्रक्रिया**

उडीद पापड उडीद डाळ ८ तास भिजवून, वाटून त्यात हिंग, मीठ, पापडखार, मिरे टाकून पीठ मळले जाते. लाटून कडक उन्हात वाळवले जाते.

२. *गव्हाचे सांडगे*: गहू उकडून, जात्यावर भरडून त्यात तिखट, मीठ, जिरे, लसूण घालून छोटे गोळे करून वाळवले जातात.

३. *कुरडया*: गव्हाचा चीक शिजवून साच्याने पांढऱ्या कपड्यावर घालून वाळवल्या जातात.

***रोजगाराची संधी***

उन्हाळी वाळवणामुळे हजारो महिलांना हंगामी रोजगार मिळाला आहे. अनेक जणींनी व्हॉट्सअॅप, फेसबुकच्या माध्यमातून घरगुती पापड-सांडग्यांची ऑनलाइन विक्री सुरू केली आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद येथून मोठ्या प्रमाणावर मागणी येत आहे. ३०० ते ६०० रुपये किलो दराने पापड-सांडग्यांची विक्री होत आहे.

**जपावी लागते काळजी**

कडक उन्हात काम करताना डिहायड्रेशन, उष्माघाताचा धोका असतो. त्यामुळे पहाटे ५ ते १० व सायंकाळी ४ नंतर काम केले जाते. डोक्यावर ओले फडके, ताक, सरबत घेत महिला काम करतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुली, सुना, सासवा एकत्र येऊन सांडगे-पापड करतात. त्यामुळे एकत्र कुटुंबपद्धती जपली जाते व परंपराही टिकून राहते. एकंदरीत कडक उन्हातही ग्रामीण महिलांच्या चेहऱ्यावर

**ठळक मुद्दे:**

**हंगाम एप्रिल-मे, कडक ऊन**
**प्रमुख पदार्थ: उडीद पापड, तांदूळ पापड, कुरडया, गव्हाचे सांडगे, मिरची सांडगे, शेवया**
**ठिकाण: जाफ्राबाद, टेंभुर्णी, देऊळगावराजा परिसरात मोठ्या प्रमाणात काम**
**व्यवसाय: महिला बचतगटांमार्फत ३००-६०० रु. किलो दराने विक्री**
**फायदा: वर्षभराची बेगमी + महिलांना घरबसल्या ८-१० हजार उत्पन्न**
**अडचण: डाळी, तेल, मिरची महाग; कडक उन्हाचा त्रास**

# संपादकीय...

## शेतकरी विरुद्ध सरकारी दुजाभाव

उद्योगांना करसवलती, पॅकेज, अनुदाने, स्वस्त जमीन, स्वस्त वीज, निर्यात प्रोत्साहन दिले जाते; पण शेतकऱ्यांना मिळणारे अल्प अनुदानसुद्धा 'मोफतखोरी' म्हणून हिणवले जाते. कुण्या उद्योगपतीला उद्योग उभारण्यासाठी जमीन लागली, रस्त्यासाठी जमीन लागली, तर शेतकऱ्यांच्याच जमिनी अधिग्रहित केल्या जातात, त्याकरिता नाममात्र मोबदला दिल्या जातो.शेतमालाचे दर वाढले, की सरकार लगेच आयात खुली आणि निर्यात बंदी, साठा बंदी लावते. म्हणजे शेतकरी नफा कमावू लागला, की सरकारच त्याच्या विरोधात उभे राहते.

देशात आज सर्वात मोठा अन्याय जर कोणावर होत असेल, तर तो शेतकऱ्यांवर होत आहे, कारण शेतकरी केवळ निसर्गाशी लढत नाही, तर सरकारी धोरणांतील दुजाभावाशीही रोज झुंज देत आहेत.

एका बाजूला उद्योग आणि शहरांसाठी वेगळी व्यवस्था... आणि दुसऱ्या बाजूला शेती आणि शेतकऱ्यांसाठी वेगळे नियम...हीच आजच्या भारताची कटू वास्तवता बनली आहे. उद्योगपती आपल्या उत्पादनाची किंमत स्वतः ठरवतो; पण जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी स्वतः पिकवलेल्या मालाचा भावही ठरवू शकत नाही.

जेव्हा पेट्रोलियम कंपन्या तोटा होतो म्हणून ओरड करतात, तेव्हा पेट्रोल-डिझेलचे भाव १० दिवसांत ४ वेळा वाढवून दिले जातात. खत कंपन्यांना खताचे भाव वाढवून दिल्या जातात. गॅस कंपन्यांचा नफा घटला, तर सिलिंडरचे दर वाढवून दिल्या जातात; मात्र सरकारी धोरणामुळेच शेती तोट्यात गेली परिणामी लाखो शेतकरी आत्महत्या करू लागले....तरी सरकार शेतमालाला उत्पादन खर्चसुद्धा द्यायला तयार नाही, कारण या देशात कंपन्यांचे नुकसान 'राष्ट्रीय चिंता' असते; पण शेतकऱ्यांचे नुकसान 'वैयक्तिक समस्या' समजली जाते. दुजाभावाचा हा चेहरा आणखी भयानक आहे.

शेतकऱ्यांवर कमाल जमीन धारणा कायदा लागू झाला. म्हणजे एका शेतकऱ्याने किती जमीन ठेवावी हे सरकार ठरवते.

कोरडवाहू जमीन ५४ एकर आणि ओलिताखालील असेल, तर १८ एकरपेक्षा जास्त जमीन शेतकरी ठेवू शकत नाही. म्हणजे शेतकरी टाटा, बिर्ला, अदानी, शेतकऱ्यांच्या बापजाद्यांनी मोठ्या काटकसरीत राहून आणि कष्टाने वाढविलेल्या शेकडो एकर जमिनी सरकारने १९६० साली ५४ एकरांचा लँड सिलिंग ॲक्ट लावून काढून घेतल्या. आज कायदा लावून ६६ वर्षे झालीत. त्या शेतकऱ्यांना समजा २ मुले असतील, तर १९६१ साली प्रत्येकाला २७-२७ एकर जमीन मिळाली. दर २० वर्षांत एक पिढी तयार होते, त्यानुसार त्या प्रत्येकाला २/२ मुले झाली, असे गृहीत धरले तर १९८० साली नातवाला १३/१३ एकर, २००० साली पंतुला ६/६ एकर, आणि २०२० साली केवळ ३/३ एकर जमीन कोणे काळी जमीनदार असलेल्या कुटुंबातील ४ थ्या वंशजाच्या वाट्याला येऊन तो अल्पभूधारक झाला.

शहरातील बिल्डर, उद्योगपती किंवा व्यापाऱ्यांनी किती घरे, मॉल, प्लॉट किंवा मालमत्ता विकत घ्यावी किंवा कारखाने, ले-आउट टाकावेत, यावर कोणतीही

जमिनी बुडतात शेतकऱ्यांच्या... घरदार उद्ध्वस्त होऊन विस्थापित होतात, देशोधडीला लागतात शेतकरी... त्या धरणात जाणारे पाणी पडते शेतकऱ्यांच्याच शेतात, त्या पाण्यासोबत त्या शेतातील सुपीक मातीसुद्धा वाहून जाते; पण तेच पाणी शहरांकडे वळवले जाते.

शेतकऱ्याला सांगितले जाते- 'पाणी नाही.'

मात्र शहरातील लॉन, टॉवर आणि उद्योगांसाठी पाणी उपलब्ध असते. हा शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावरचा डाका नाही का?

शहरातील वस्त्यांमध्ये पोलिसांची गस्त असते.

सुरक्षेसाठी यंत्रणा सज्ज असते. पण शेतकऱ्यांच्या शेतात रानडुक्कर, नीलगाय, हत्ती, बिबटे, माकड पिकांचे नुकसान करतात; कधी कधी शेतकऱ्यांचे जीवही जातात. तरीही शेती आणि पिकांच्या संरक्षणासाठी कोणतीही ठोस राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्था नाही. शेतकरी आपल्या पिकाचे रक्षण करण्यासाठी रात्रभर शेतात जागतो, आणि सकाळी त्यालाच वन्यजीव कायद्याचे धडे दिले जातात. मोठ्या कष्टाने वाचवलेल्या पिकाला योग्य भावसुद्धा सरकार आणि व्यवस्था मिळू देत नाही, हा न्याय की अन्याय?

उद्योगपती हजारो कोटींचे कर्ज बुडवतो.

मग , पुनर्रचना, सेटलमेंट, हेअरकट अशा गोंडस नावाखाली त्याचे कर्ज पुन्हा माफ किंवा पुनर्रचित केले जाते. त्याचे नावही अनेकदा गुप्त ठेवले जाते. त्याला पुन्हा नवीन कर्जही दिले जाते.

केवळ मागील ७ वर्षांत २५ लाख कोटी रुपये सरकारने माफ केले किंवा सोडून दिले; पण एखाद्या शेतकऱ्याचे दोन लाख रुपये थकले, त्याला कारणसुद्धा, आयात खुली, निर्यात बंद, साठा मर्यादा अशी सरकारची धोरणे, तर त्या शेतकऱ्यांच्या नावाची गावभर जाहीर बदनामी होते. बँकेच्या नोटिसा येतात, वर्तमानपत्रात छापल्या जातात. जमीन जप्तीची कारवाई होते. बिल भरले नाही म्हणून वीज कापली जाते.

एकासाठी 'कॉपेरिट रेस्क्यू, अनेक सुविधा आणि दुसऱ्यासाठी 'वसुली मोहीम'

-दोन लेकरांना दोन वेगवेगळे न्याय कसे?

उद्योगांसाठी ' ' आहे.

पण शेतकऱ्यांसाठी ' ' अजूनही स्वप्न आहे.

उद्योगांना करसवलती, पॅकेज, अनुदाने, स्वस्त जमीन, स्वस्त वीज, निर्यात प्रोत्साहन दिले जाते; पण शेतकऱ्यांना मिळणारे अल्प अनुदानसुद्धा 'मोफतखोरी' म्हणून हिणवले जाते. कुण्या उद्योगपतीला उद्योग उभारण्यासाठी जमीन लागली, रस्त्यासाठी जमीन लागली, तर शेतकऱ्यांच्याच जमिनी अधिग्रहित केल्या जातात, त्याकरिता नाममात्र मोबदला दिल्या जातो.

शेतमालाचे दर वाढले, की सरकार लगेच आयात खुली आणि निर्यात बंदी, साठा बंदी लावते. म्हणजे शेतकरी नफा कमावू लागला, की सरकारच त्याच्या विरोधात उभे राहते.

देशातील प्रत्येक नागरिकाला दिवसातून तीन वेळा अन्न हवे असते; पण ते अन्न निर्माण करणारा शेतकरी मात्र सर्वात असुरक्षित, कर्जबाजारी आणि अपमानित आयुष्य जगत आहे.

# राजं छत्रपती झालं शिवराज्याभिषेक दिन : इतिहासातून वर्तमानाला मिळणारी दिशा

६ जून हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण म्हणून ओळखला जातो. इ.स. १६७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य राज्याभिषेक झाला आणि हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले.हा केवळ एका राजाचा राज्यारोहण सोहळा नव्हता,तर शतकानुशतके परकीय सत्तेखाली दबलेल्या जनतेच्या स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा विजय होता.छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची स्थापना केली.त्यांनी रयतेच्या हिताला सर्वोच्च स्थान दिले.न्याय,पारदर्शकता,सुरक्षितता आणि लोककल्याण या तत्त्वांवर त्यांनी शासन उभारले.शेतकरी,कष्टकरी महिला,आणि स्वराज्यातील सर्वसामान्य जनतेचे हित जपणारे प्रशासन ही त्यांच्या राज्याची वैशिष्ट्ये होती.महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून शासनकारभार व्यवस्थित चालत असे.प्रत्येक निर्णयामध्ये जनकल्याणाचा विचार अग्रस्थानी असे.रायगडावरील राज्याभिषेकाने स्वराज्याला वैधानिक मान्यता मिळाली.शिवाजी महाराज छत्रपती झाले आणि मराठी राज्याची ओळख जगभर निर्माण झाली.या घटनेने स्वराज्यातील जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण केले.स्वराज्य म्हणजे केवळ सत्ता नसून जनतेच्या कल्याणासाठी असलेली जबाबदारी आहे,हा संदेश महाराजांनी दिला.आजच्या काळात शिवराज्याभिषेक दिन साजरा करताना आपण महाराजांच्या विचारांकडे नव्याने पाहण्याची गरज



आहे.भ्रष्टाचारमुक्त प्रशासन,लोकाभिमुख शासन,कायद्याचे राज्य,महिलांचा सन्मान,पर्यावरण संरक्षण आणि सर्वसमावेशक विकास हीच खरी शिवरायांना मानवंदना आणि खरा मुजरा ठरेल. शासन आणि प्रशासनानेही शिवरायांच्या आदर्शांमधून प्रेरणा घेऊन जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.सर्वधर्मसमभाव आणि विकासाची समान संधी या मूल्यांची आज नितांत गरज आहे.शासन यंत्रणेने आणि लोकप्रतिनिधींनी शिवरायांच्या आदर्शांचा अभ्यास करून त्यानुसार कार्य करण्याची आवश्यकता आहे.सध्याच्या काळात विकासाच्या अनेक योजना राबवल्या जात असल्या तरी सर्वसामान्य नागरिकांना न्याय,सुविधा आणि पारदर्शक सेवा मिळणे हेच खरे सुराज्य आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या हितासाठी जे तत्त्वज्ञान दिले,त्याचा अवलंब केल्यास प्रशासन अधिक लोकाभिमुख होऊ शकते.नागरिकांनीही आपल्या हक्कांबरोबर कर्तव्यांची जाणीव ठेवून समाजहितासाठी योगदान दिले पाहिजे. आज शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जतन करण्याचा संकल्प केला पाहिजे.स्वराज्याच्या प्रेरणेतून सुराज्य घडविण्याची जबाबदारी आपली आहे.समाजातील अन्याय,भ्रष्टाचार,असमानता आणि उदासीनता यांच्याविरुद्ध लढत लोकहिताला प्राधान्य देणे हीच शिवरायांना खरी मानवंदना ठरेल.छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही मार्गदर्शक आहे.त्यांचे शौर्य,दूरदृष्टी,व्यवस्थापन कौशल्य आणि राष्ट्रनिष्ठा प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे.शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक स्मरणाचा दिवस नसून स्वाभिमान,सुशासन आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा दिवस आहे.शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक उत्सव नाही, तर स्वराज्याच्या मूल्यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे.हा दिवस आपल्याला राष्ट्रप्रेम,स्वाभिमान,त्याग,शौर्य आणि लोकसेवेची प्रेरणा देतो.शिवरायांनी घालून दिलेला आदर्श आजच्या पिढीने समजून घेतला तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते.६ जून रोजी आपण सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचा वारसा जपत स्वराज्याच्या विचारांना आधुनिक सुराज्याशी जोडण्याचा संकल्प केला पाहिजे.हाच शिवराज्याभिषेक दिनाचा खरा संदेश आणि महाराजांना खरा मुजरा ठरेल.



**केतन द.भोज**
**सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**

पान १ व ४ वरुन....

### निलंबनाची पार्श्वभूमी...

अधिकारांतर्गत वेळेत आणि योग्य माहिती दिली जात नाही.

कागदोपत्री ग्रामसभा: तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा केवळ कागदावरच दाखवून बेकायदेशीर कामे मंजूर केली जात आहेत.

बेकायदेशीर पदवीधर कार्यक्रम: सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी असल्यासारखे गटविकास अधिकारी बेकायदेशीरपणे पदवीधर कार्यक्रमांचे आयोजन व उपस्थिती लावत आहेत

१५ व्या वित्त आयोगाचा निधी हडप: परतूर पंचायत समितीला प्राप्त झालेला १५ व्या वित्त आयोगाचा शेष निधी विशिष्ट गावांना ३०% ते ४०% कमिशन घेऊन विकला गेल्याचा संशय आहे.

कार्यालय रामभरोसे: आठवड्यातून पाच दिवस काम करणे बंधनकारक असताना, बी.डी.ओ. साहेब कार्यालयाला नेहमी कुलूप लावून गायब असतात व इतर कर्मचारीही जागेवर नसतात.

**आठ दिवसांत चौकशी न झाल्यास रास्ता रोको!**

या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन चौकशी समिती नेमण्यात यावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. येत्या आठ दिवसांत (सहा जून) ठोस कारवाई न झाल्यास, दिनांक ०८/०६/२०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडी जालना जिल्ह्याच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन तसेच रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

### जलसंवर्धन ही...

अमृत तारो आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा तुळशीच्या रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढते जलसंकट, भूजल पातळीतील सातत्याने होत असलेली घट आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम लक्षात घेता युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ''आजच्या बदलत्या हवामान परिस्थितीत जलसंवर्धन आणि जलसाक्षरता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. युवकांनी निसर्गाशी एकरूप होत पाणी बचत, वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि जलव्यवस्था पनाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जलसंपत्ती निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.''सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू यांनी युवकांना संबोधित करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलव्यवस्थापनाच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवकालीन किल्ले, तलाव, बंधारे आणि जलसाठवण व्यवस्था आजही जलसंवर्धनाचे आदर्श उदाहरण आहेत. आधुनिक काळातही त्या पद्धतींचा अभ्यास करून जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता आहे. यावेळी जलदिंडी अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला. पथनाट्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच विविध गावांमध्ये रॅली, जनजागृती फेऱ्या, संवाद सत्रे आणि प्रत्यक्ष प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांनी सांगितले की, जलदिंडी अभियान दि. १ ते ५ जून दरम्यान सोमठाणा, निकळक, अकोला, देवगाव, कुसळी, मात्रेवाडी, सेलगाव आणि पाडळी या गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आले. या अभियानाद्वारे युवक, महिला, शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये जलसाक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. देवेशजी पाथ्रीकर यांनी जलसंवर्धनाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वृक्षलागवड केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता त्याचे जतन, संगोपन आणि संवर्धन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बी. एस. सय्यद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामसेवक पवन अवघन, पोलीस पाटील भाग्यश्री शेळके, अविनाश शेळके, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे, प्रा. अविनाश हटकर तसेच विविध स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास गावकरी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### देवस्थान इनाम जमिनींचे...

व्यवहारांचे व्यवस्थापन आणि संपत्तीचे संरक्षण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. प्रस्तावित अधिनियम हा या घटनात्मक अधिकारांच्या विरोधात जाऊन धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर आघात करणारा ठरू शकतो, असा दावा डॉ. देशमुख यांनी केला.

**प्रमुख मागण्या**

निवेदनाद्वारे शासनाकडे पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत

महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६ तात्काळ मागे घ्यावा.

देवस्थान इनाम जमिनींचे कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरण, निर्मूलन अथवा खाजगीकरण करू नये.

देवस्थानांच्या उत्पन्न स्रोतांना स्वतंत्र कायदेशीर संरक्षण द्यावे.

अंतिम निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान ट्रस्ट, विश्वस्त मंडळी, पुजारी, वारकरी संप्रदाय, भाविक आणि धार्मिक संस्थांची सार्वजनिक सुनावणी आयोजित करावी.

राज्यातील सर्व देवस्थान जमिनींचे संरक्षण, अतिक्रमण निर्मूलन आणि महसुली अभिलेख अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. आंदोलनाचा इशारा शासनाने या हरकतीकडे दुर्लक्ष केल्यास देवस्थानांच्या जमिनी वाचविण्यासाठी राज्यव्यापी जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही डॉ. निसार अहमद देशमुख यांनी दिला आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

यावेळी निवेदन सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जालना जिल्हाध्यक्ष डॉ. निसार अहमद देशमुख यांच्यासह आमदार चंद्रकांत आण्णा दानवे पाटील, जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश भाऊ टोपे, बबलुजी चौधरी, तय्यब बापू देशमुख, राम सिरसाठ, कुंदन गोविंद राठोड, पांडुरंग जऱ्हाड, सतीश होडे, राजेंद्र जाधव, नंदकिशोर जागंडे, राम देवकर, सुरेश खंडागळे, ज्ञानेश्वर धानुरे, भरतराव कदम, मुक्ताराम भापकर, सुदामराव शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भोकरदन तालुक्यातील...

झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वी केलेल्या तोंडी व लेखी विनंत्यांना केराची टोपली दाखवली आहे,'' असे बोरशे गुरुजी म्हणाले.

मागण्या व अल्टिमेटम: बोरशे गुरुजी यांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत:

१. दोन्ही रस्त्यांची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत तात्काळ चौकशी करावी. २. कामे इस्टिमेट व नॉर्म्सप्रमाणे तात्काळ पूर्ण करून घ्यावीत.३. दोषी गुत्तेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार फौजदारी कारवाई करावी.

४. कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावण्याचे आदेश द्यावेत. दि. १७/०६/२०२६ पर्यंत चौकशी सुरू करून लेखी कळवावे. अन्यथा दि. ०१/०७/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून ग्रामपंचायत कार्यालय, करजगांव येथे लोकशाही मार्गाने आमरण उपोषणास बसणार. होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा व ग्रामपंचायत प्रशासनाची राहील,'' असा इशारा बोरशे गुरुजी यांनी नोटिशीद्वारे दिला आहे.

### नागरिकांचे हित...

परवानग्या आणि इतर प्रशासकीय बाबींचे नियोजन पूर्वतयारीत पूर्ण करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीत कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. बैठकीत प्राप्त झालेल्या सर्व सूचनांचा अंतिम आराखड्यात योग्य समावेश करावा. मुंबईसारख्या महानगरात पार्किंगची समस्या गंभीर असून, मोठ्या प्रमाणात पार्किंग सुविधा निर्माण करणे हे महत्त्वाचे योगदान ठरू शकते. त्यामुळे अशा प्रकल्पांमधून उपलब्ध होणाऱ्या जागा आणि सुविधांचा व्यापक दृष्टीकोनातून विचार केला जावा.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेसाठी आणि भविष्यातील गरजांचा विचार करून दीर्घकालीन आर्थिक आराखडा असणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागाने सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनासमोर मांडावा. या माध्यमातून शासनाला मिळणारा महसूल, शहराला होणारे लाभ आणि संस्थेच्या भविष्यातील गरजा यांचा समतोल साधता येईल. हा प्रस्ताव सादर करताना जनतेचा विचार, कर्मचाऱ्यांचा विचार आणि शहराचा विचार या तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आराखडा तयार करावा. ''प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जास्तीत जास्त वेगाने, सर्व संबंधितांनी प्रामाणिकपणे आणि समन्वयाने कार्य करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवा.

**मुंबईच्या वेशीवरील ऑक्ट्रोय नाके विकसित करा**

मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शहरात बाहेरून येणाऱ्या बसेसला ऑक्ट्रोय नाक्यांवर पार्किंगची व्यवस्था निर्माण करून दिली पाहिजे. या ठिकाणी प्रवाशांसाठी सुविधांची उभारणी करावी. त्याकरिता मुंबईच्या वेशीवरील दहिसर, मानखुर्द, मुलुंड येथील आनंद नगर, एलबीएस रस्ता, एरोली नका येथील ऑक्ट्रोय नाके विकसित करावेत. या ठिकाणी बसेस पार्किंग आणि प्रवासी चढ - उतार सुविधा निर्माण केल्यास मुंबईत शहरात खासगी बसेस आणण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीवर मात करणे शक्य होईल. हे नाके ट्रान्सपोर्ट हबच्या स्वरूपात विकसित करावे. एसटी महामंडळ बसेसबाबत स्वतंत्ररित्या चर्चा करून समन्वयाने निर्णय घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. याबाबत महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी सादरीकरण केले. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन बेस्ट उपक्रमाच्या विद्यमान महाव्यवस्थापक डॉ. सोनिया सेठी यांनी बेस्टच्या मालकीच्या डेपो आणि इतर मालमत्तांच्या विकासासंदर्भातील सादरीकरण केले. यावेळी त्यांनी मुंबईतील १३२ एकर क्षेत्रावर पसरलेल्या एकूण २२ बस आगारांचा पीपीपी मॉडेलद्वारे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांसह पुनर्विकास करण्यासाठी बेस्ट उपक्रमाचे आदर्श बस धोरणाचे सादरीकरण केले. त्यांनी बेस्टचा वित्तीय अहवाल आणि सद्यस्थिती, परिवहन स्थिती, बसेसची आवश्यकता, बेस्टचे आगार, पार्किंग व चार्जिंगची समस्या याचीही माहिती दिली. बेस्टने सिंगापूर, पॅरिस, हाँगकाँग आणि लंडन येथील आधुनिक बस डेपोंच्या धर्तीवर मुंबईतील २२ डेपोंचे आधुनिकीकरण करण्याचे निश्चित केले आहे. या धोरणांतर्गत डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर () या तत्त्वावर खासगी भागीदारांच्या मदतीने प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल. नव्याने ७,००० बसेसची व्यवस्था, स्मार्ट ईव्ही चार्जिंग, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, डेपोच्या जमिनीचा कमाल वापर करून तिथे कमर्शियल कॉम्प्लेक्स, रिटेल मॉल्स, अर्बन प्लाझा, आर्ट गॅलरी, कार पार्किंगची सार्वजनिक सोय केली जाईल, अशी माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

### नीट परीक्षा पारदर्शक...

परीक्षण एजेंसी (एनटीए) महासंचालक अभिषेक सिंह यांनी सादरीकरणाद्वारे नीट महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रांची संख्या, उपलब्ध सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती यावेळी दिली.

### महाडीबीटी पोर्टलवर...

तसेच जास्तीत जास्त शेतकरी गटांनी पीक प्रात्यक्षिके या घटकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. प्रात्यक्षिके व बियाण्यांच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# सुंदरनगर पाण्याखाली, नागरिक समस्यांच्या विळख्यात; मनपाच्या उदासीनतेविरोधात संतापाचा उद्रेक

## पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि स्वच्छतेच्या प्रश्नांवर नागरिक आक्रमक; सार्वजनिक एकात्मता सामाजिक संघटनेचे मनपाला निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आलेला असताना जालना शहरातील सुंदरनगर परिसरातील पाणीपुरवठा, अंडर ड्रेनेज आणि स्वच्छतेच्या गंभीर समस्यांमुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून सार्वजनिक एकात्मता सामाजिक संघटनेच्या वतीने महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन तात्काळ उपाययोजनांची मागणी करण्यात आली आहे. संघटनेने दिलेल्या




निवेदनात म्हटले आहे की, सुंदरनगर भागातील पाण्याची टाकी अनेक महिन्यांपासून गळती अवस्थेत असून दररोज हजारो लिटर पिण्याचे पाणी वाया जात आहे. पाणीटंचाईच्या काळात अमूल्य पाण्याचा असा अपव्यय होत असताना संबंधित अधिकारी मात्र डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेकदा सूचना देऊनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.दुसरीकडे परिसरातील अनेक रस्ते आणि गल्ल्यांमध्ये अंडर ड्रेनेज व्यवस्था नसल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि साथीच्या रोगांचा धोका वाढला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

निवेदन स्वीकारताना महानगरपालिकेच्या उपायुक्त नंदा गायकवाड यांनी संबंधित विभागांना तातडीच्या सूचना देण्याचे आश्वासन दिले असले तरी नागरिकांना आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामांची अपेक्षा असल्याचे स्पष्टपणे सांगण्यात आले. दरम्यान, प्रभाग क्रमांक १२ मधील नगरसेवकांवरही नागरिकांनी जोरदार टीका केली आहे. ‘‘निवडणुकीनंतर नागरिकांच्या समस्या विसरून फक्त ठेकेदारी आणि राजकारणात व्यस्त असलेले नगरसेवक आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावेत आणि सुंदरनगरच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे,‘‘ अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांमुळे नागरिकांचा संयम संपत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. समस्या तातडीने न सोडवल्यास तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही सार्वजनिक एकात्मता सामाजिक संघटनेने दिला आहे. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांच्यासह अनिल इंगोले, जाकेर शेख, शेख मुश्ताक, अदिनाथ पाटोले, लक्ष्मण घनवट, पप्पू अतार, रईस शेख, गणेश इंचे, फेरोज खान आदींसह परिसरातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विमा कंपन्यांची मनमानी; आयोगाचा दणका

रुग्णालयात एका आजारावर उपचार घेतले असताना, तपासणीत आढळलेल्या दुसऱ्याच आजारांचे कारण पुढे करून विमा दावा नाकारणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आणि सेवेतील त्रुटी आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल पूर्व दिल्ली जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने दिला आहे. स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनीने एका महिलेचा मेडिक्लेम दावा चुकीच्या पद्धतीने फेटाळल्याप्रकरणी आयोगाने हा निर्णय दिला. ज्या आजारांवर उपचारच घेतले नाहीत, केवळ त्या आजारांचा पॉलिसीतील वगळलेल्या कलमांमध्ये समावेश आहे, या तांत्रिक कारणास्तव दावा नाकारता येणार नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

तक्रारदार अनुराधा नारंग यांनी स्टार हेल्थ कंपनीकडून ७.५ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी घेतली होती. पॉलिसी कालावधीत, त्यांच्या मुलीला पोटदुखी आणि उलट्यांच्या तीव्र त्रासामुळे सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक निदानानुसार, ‘ॲक्यूट गॅस्ट्रोएन्टेरिटिस’ या आजारासाठी कंपनीने कॅशलेस दाव्याला तात्पुरती मंजुरीही दिली. मात्र, डिस्चार्जच्या वेळी एंडोस्कोपी आणि कोलोनोस्कोपी रिपोर्टमध्ये हाइटस हर्निया आणि डुओडेनाइटिस सारखे आजार दिसल्याचे कारण देत कंपनीने दावा फेटाळला. हे आजार पॉलिसीच्या दोन वर्षांच्या वगळलेल्या कलमांतर्गत येत असल्याने दावा देता येणार नाही, असा पवित्रा कंपनीने घेतला.

या निकालावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना, नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी विमा कंपन्यांच्या अशा मनमानी कारभारावर तीव्र टीका केली. ॲड. धन्नावत म्हणाले, ‘‘विमा कंपन्या अनेकदा पॉलिसीतील किचकट आणि तांत्रिक कलमांचा आधार घेऊन सामान्य ग्राहकांचे हक्काचे पैसे नाकारतात. ज्या आजारांवर रुग्णाने उपचारच घेतले नाहीत, केवळ ते निदान प्रक्रियेत समोर आले म्हणून मुख्य उपचाराचा खर्च नाकारणे हा निव्वळ अन्याय आहे. ज्याप्रमाणे नागरिकांनी न्यायाधीशांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे गैर आहे, त्याचप्रमाणे विमा कंपन्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि अधिकारांचा गैरवापर करून ग्राहकांची पिळवणूक करणे हे सुद्धा गंभीर आहे. ग्राहक आयोगाचा हा निर्णय अशा प्रवृत्तींना आळा घालणारा असून, तो ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आहे.‘‘

तक्रारदाराने उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र सादर करून स्पष्ट केले की, रुग्णावर केवळ ‘ॲक्यूट गॅस्ट्रोएन्टेरिटिस’साठी उपचार करण्यात आले होते आणि तपासणीत आढळलेल्या इतर आजारांवर कोणतेही उपचार झाले नाहीत. तरीही कंपनीने दावा देण्यास नकार दिल्याने, त्यांनी ग्राहक आयोगात धाव घेतली. आयोगाने सर्व कागदपत्रे तपासल्यानंतर स्पष्ट केले की, विमा कंपनी आपला दावा सिद्ध करू शकली नाही. रुग्णाला ज्या आजारासाठी रुग्णालयात दाखल केले होते, तो आजार पॉलिसीमध्ये समाविष्ट होता. त्यामुळे केवळ निदान प्रक्रियेत आढळलेल्या आणि उपचार न घेतलेल्या आजारांसाठी वगळलेले कलम लागू होत नाही, असे निरीक्षण आयोगाने नोंदवले.

अखेरीस, आयोगाने स्टार हेल्थ इन्शुरन्स कंपनीचा युक्तिवाद फेटाळून लावत तक्रारदाराची तक्रार मान्य केली. कंपनीने तक्रारदाराला उपचाराचा खर्च १,८१,८४९ रुपये ९% व्याजासह परत करावा, तसेच मानसिक त्रासापोटी २०,००० रुपये आणि खटल्याच्या खर्चासाठी १२,५०० रुपये ३० दिवसांच्या आत द्यावेत, असा आदेश दिला. वेळेत रक्कम न दिल्यास, तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून १२% व्याज लागू होईल, असेही आयोगाने स्पष्ट केले.

# पत्रकारांवरील हल्ला नव्हे, तर लोकशाहीवरील हल्ला नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील दोन पत्रकारांवर झालेल्या कथित हल्ल्यांच्या घटनांमुळे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक आणि राजकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी या घटनांचा जाहीर निषेध करत, ‘‘हा केवळ पत्रकारांवरील हल्ला नसून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला हल्ला आहे,‘‘ अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दोन दिवसांपूर्वी रात्री उशिरा जगाचे जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांना त्यांच्या कार्यालयासमोर अज्ञात व्यक्तींनी धमकावल्याची घटना घडली. ‘‘बातम्या बंद कर, अन्यथा गोळ्या घालू,‘‘ अशा स्वरूपाची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे पत्रकारांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच दिव्यांग वार्ताचे संपादक राहुल मुळे यांना राजूर रोडवरील घाणेवाडी शिवार परिसरात नेऊन तब्बल पाच तास एका छोट्या खोलीत कोंडून ठेवत बेदम मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेने संपूर्ण पत्रकारिता क्षेत्र हादरून गेले असून पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या दोन्ही घटनांबाबत प्रतिक्रिया देताना नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले म्हणाले की, ‘‘पत्रकार हे समाज आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतात. जनतेच्या समस्या, विकासकामे, अन्याय-अत्याचार, भ्रष्टाचार आणि समाजहिताच्या विविध बाबी लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करत असतात. त्यामुळे पत्रकारांवर होणारा प्रत्येक हल्ला हा सत्य दडपण्याचा आणि लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे.

# दुधना नदीपात्रातील अवैध वाळू उपशावर घनसावंगी पोलिसांचा मोठा छापा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात घनसावंगी पोलिसांनी मोठी कारवाई करत भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रातून अवैधरित्या सुरू असलेले वाळू उत्खनन उधळून लावले. या कारवाईत ३ जेसीबी मशीन, ८ हायवा टिपर आणि १२ ब्रास वाळूसह तब्बल ३ कोटी ४५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.४५ वाजता घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तालुक्यातील मौजे भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रात काही व्यक्ती जेसीबी मशीन आणि हायवा टिपरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करीत आहेत. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी तातडीने दोन स्वतंत्र पथके तयार करून कारवाईचे नियोजन केले. त्यानुसार पोलीस पथकाने भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रात छापा टाकला. यावेळी नदीपात्रात ३ जेसीबी मशीनद्वारे ८ हायवा टिपरमध्ये वाळू भरली जात असल्याचे प्रत्यक्ष आढळून आले. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाड टाकून जेसीबी मशीन, हायवा टिपर आणि त्यांचे चालकांना ताब्यात घेतले. यावेळी संबंधित चालकांकडे वाळू उत्खनन व वाहतुकीसाठी आवश्यक असलेले कोणतेही वैध परवाने, पावत्या किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश उपलब्ध नव्हते. चौकशीदरम्यानही आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याने पोलिसांनी संबंधित वाहनांसह वाळू जप्त केली. या कारवाईत ३ जेसीबी मशीन, ८ हायवा टिपर आणि १२ ब्रास वाळू असा एकूण ३,४५,५५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणण्यात आला असून या प्रकरणी ४ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध उत्खननाविरोधातील मोठा संदेश

दुधना नदीपात्रातील ही कारवाई जिल्ह्यातील अवैध वाळू माफियांना मोठा इशारा मानली जात आहे. पर्यावरणाचे नुकसान, नदीपात्रांची होणारी हानी आणि शासनाच्या महसुलाचे होणारे नुकसान रोखण्यासाठी पोलीस व महसूल प्रशासनाने संयुक्तपणे कठोर भूमिका घेण्याची गरज असल्याचे नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# ६ जुन शिवराज्याभिषेक दिवस

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला.त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी, कुपोषण यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे.त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे ‘‘भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा‘‘ यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवासाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दुःखात सहभागी व्हायला पाहिजे. १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते. ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे ‘‘राज्याभिषेक सोहळा‘‘घराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे.आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार, महागाई याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे.शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचलेच पाहिजे. जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.१९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर व इतिहास आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती.आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले. अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले.अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा. यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे.यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदूषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.शिवरायांना माझा मानाचा मुजरा. जय शिवाजी. हर हर महादेव.



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# कधी बदलणार समाजाची मानसिकता?

पुणे जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन महिलांचे बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपींसह काही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून या गर्भलिंग निदान रॅकेटची कसून चौकशी पोलिस करत आहेत. एक डॉक्टर बेकायदेशीर गर्भलिंग निदान करत असल्याचा व्हिडिओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला असून या रॅकेटची व्याप्ती खूप मोठी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले असून या बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या टोळीने ५०० हून अधिक स्त्रीभ्रूण हत्या केल्या असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा भांडाफोड झाल्याने सर्वत्र खळबळ माजली असून स्त्री भ्रूण हत्येचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बेकायदेशीर गर्भलिंग निदान करून स्त्री भ्रूण हत्या करणे कायद्याने गुन्हा असतानाही असे प्रकार सातत्याने घडताना दिसतात. अर्थात याला समाजाची मानसिकता कारणीभूत आहे आज २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातील आहे हेच यावरून सिद्ध झाले आहे. स्त्री भ्रूण हत्येच्या घटनांवरून सिद्ध होते की आजही आपण मुलींकडे सकारात्मक दृष्टीने पाहत नाही. केवळ ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही मुलींकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. मुलगी म्हणजे परक्याचे धन ही अठराव्या शतकातील मानसिकता आजही कायम आहे. मुलगी ही परक्याचे धन असल्याने तिला जन्म घेण्याचा अधिकारच नाही अशी पुरुषी मानसिकता आजही समाजातील काही लोकांत आहे जरी मुलगी जन्माला आली तरी तिला प्रत्येक पातळीवर मानहानी स्वीकारावी लागते. मुलांना हारतुरे देऊन त्यांचा लाड करणारा आपला समाज मुलींचा गळा घोटायला देखील मागेपुढे पाहत नाही. मुलांना वंशाचा दिवा म्हणतात पण मुलगी देखील वंशाची पणती आहे हे विसरून तिला विजवले जाते. एकाच समाजाचे हे दोन भिन्न टोक विदारक चित्र दर्शवते. मुलींबद्दल आपल्या समाजात कमालीची असहिष्णुता दिसते. कधी मुलींना गर्भातच मारून टाकले जाते तर कधी जन्मल्यानंतर कचऱ्याच्या कुंडीत फेकून दिले जाते. एकीकडे दुर्गा, लक्ष्मी या देवींची पूजा करायची तर दुसरीकडे त्यांचेच दुसरे रूप असलेल्या मुलींचा मात्र दुस्वास करायचा. ज्या देशात राष्ट्रपती, पंतप्रधान असे देशाचे सर्वोच्चपद महिलेने सांभाळले आहे त्याच देशात मुलींना जन्म घेण्याचा देखील अधिकार नाही याला काय म्हणावे ? आजही भारतीय समजात मुलगा, मुलगी असा भेद केला जातो म्हणूनच लिंग परीक्षण, स्त्रीभ्रूण हत्या या सारखे प्रकार या देशात घडतात. आपल्या देशात लिंग परीक्षण, भ्रूण हत्येला बंदी असतानाही कधी कायद्याच्या पळवाटा शोधून तर कधी कायद्याचे रक्षक असलेल्या शासन आणि प्रशासनाचे हात ओले करून लिंग परीक्षण व स्त्री भ्रूण हत्या केली जाते म्हणूनच आपल्या देशात मुलांच्या मानाने मुलींचा जन्मदर कमी होत चालला आहे. काही वर्षापूर्वी युनायटेड स्टेट ऑफ पॉप्युलेशन फंड ( यूएनपीएफ) या लोकसंख्या विषयी अभ्यास करणाऱ्या जागतिक संस्थेने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालानुसार हा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीच्या चार वर्षात भारतातल्या ४ लाख ६० हजार मुलींचा जन्माआधीच गळा घोटण्यात आला होता. त्यात गर्भलिंग परीक्षणात दोन तृतीयांश तर प्रसूती पश्चात मुलगी झाल्याचे कळल्याने एक तृतीयांश मुली नाहीशा झाल्या होत्या. भारतासारख्या पुरोगामी देशाला खाली मान घालायला लावणारा हा अहवाल होता. २१ व्या शतकातही आपल्या समाजाची मानसिकता १८ व्या शतकातीलच आहे हे दाखवणारा हा अहवाल होता. हा अहवाल सरकारच्या देखील डोळ्यात अंजन घालणारा होता. या अहवालानंतर सरकार गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्ये विरोधात कठोर भूमिका घेईल आणि दोषींना कठोरातील कठोर कारवाई करेल जेणे करून या घटनांना आळा बसेल अशी अपेक्षा होती पण ती अपेक्षा फोल ठरली असेच पुण्यातील या घटनेने म्हणावे लागेल. केवळ बेटी बचाओ, बेटी पढाओ अशी नारेबाजी करून मुली वाचणार नाहीत तर त्यासाठी सरकारने ठोस धोरण आखायला हवे. लिंग परीक्षण, स्त्री भ्रूण हत्ये विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करायला हवी. दोषींना कठोर शक्षिा करायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता बदलायला हवी त्यासाठी समाजाचे सातत्याने प्रबोधन व समुपदेशन करायला हवे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# डॉ. निलेश पगारे यांचा काव्यसंग्रह लवकरच वाचकांच्या भेटीला

## विश्वविक्रमी प्रोफेटीक कवितांचे असणार मुख्य आकर्षण!

**मुंबई/जालना - प्रतिनिधी**

साहित्य क्षेत्रात नवनवीन प्रयोग नेहमीच वाचकांना आकर्षित करत असतात. याच पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उंचावणारे प्रसिद्ध लेखक आणि कवी डॉ. निलेश पगारे यांचा एक अत्यंत आगळावेगळा आणि वैविध्यपूर्ण काव्यसंग्रह लवकरच वाचकांच्या भेटीला येत आहे. हा काव्यसंग्रह केवळ कवितांचा संग्रह नसून साहित्यातील एक नवा प्रयोग मानला जात आहे. विशेष म्हणजे, यामध्ये विश्वविक्रमासाठी लिहिलेल्या अत्यंत दुर्मिळ अशा प्रोफेटीक (भविष्यसूचक) कवितांचा समावेश करण्यात आला आहे.

काय आहे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य ?

डॉ. निलेश पगारे यांच्या या नव्या पुस्तकात केवळ कविता वाचायला मिळणार नाहीत, तर प्रत्येक कवितेत वापरलेल्या शब्दांचे मूळ अर्थ आणि त्यांचे संदर्भ यांचे स्वतंत्र, सविस्तर विश्लेषण करून ते वेगळे लिहिले गेले आहे. यामुळे वाचकांना कवितेचा केवळ वरवरचा अर्थ न कळता, त्यामागील गर्भितार्थ आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक संदर्भ अतिशय सोप्या भाषेत समजून घेता येतील.



कविता, कादंबरी आणि दंतकथेचा अनोखा त्रिवेणी संगम!

हा काव्यसंग्रह वाचताना वाचकांना तो केवळ एक कवितासंग्रह असल्याचा भास होणार नाही. या पुस्तकाची रचना आणि मांडणी अशी आहे की, वाचताना त्यात कादंबरीची भव्यता, कथेची उत्सुकता आणि प्राचीन दंतकथांची गूढता जाणवेल. हा त्रिवेणी संगम वाचकांसाठी एक अतिशय आगळावेगळा आणि समृद्ध वाचन अनुभव ठरणार आहे.

देव, दैत्य ते मानव संस्कृतीवर शब्दांची जादू!

या संग्रहातून देव, दैत्य, दानव यांच्यापासून ते थेट आधुनिक मानव संस्कृतीच्या प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला आहे. लेखकाने आपल्या शब्दांची जादू अनेक भाषांच्या माध्यमातून वाचकांसमोर आणली आहे. या विविध भाषांमधील शब्दांचे अर्थ आणि त्यांची प्रोफेटीक रचना व्याकरणाची एक अगदी नवीन आणि प्रगल्भ बाजू वाचकांसमोर स्पष्ट करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भाषा आणि व्याकरणाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हे पुस्तक मैलाचा दगड ठरू शकते.

१२ विश्वविक्रमांचे मानकरी डॉ. निलेश पगारे!

डॉ. निलेश पगारे यांच्या नावावर यापूर्वीच तब्बल १२ आंतरराष्ट्रीय विश्वविक्रमांची नोंद आहे. यामध्ये लंडन, अमेरिका, दुबई आणि श्रीलंका यांसारख्या विविध देशांमधील नामांकित जागतिक विक्रमांचा समावेश आहे. विविध लेखकांसोबत केलेल्या सहकार्यात्मक (कोलॅब) पुस्तकांनंतर, डॉ. पगारे यांचे हे स्वतंत्र असे दुसरे पुस्तक असणार आहे. त्यामुळे त्यांच्या या सोलो प्रकल्पाविषयी साहित्य वर्तुळात आणि वाचकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.


साहित्याचा एक नवा मानदंड प्रस्थापित करू पाहणारा हा काव्यसंग्रह लवकरच सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार आहे.

# भोकरदन तालुक्यातील करजगांवच्या दोन रस्त्यांची कामे अर्धवट व निकृष्ट दर्जाची

## १ जुलैपासून बोर शे गुरुजींचे करजगांव येथे आमरण उपोषण!

**दत्ता देशमुख**

भोकरदन तालुक्यातील सुरंगली ते जळगांव सपकाळ व करजगांव ते कोकडी फाटा या दोन महत्त्वाच्या रस्त्यांची कामे अनेक महिन्यांपासून अर्धवट स्थितीत असून झालेल्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते कडुबा विनायकराव बोरशे (बोरशे गुरुजी) यांनी केला आहे. याबाबत बोरशे गुरुजी यांनी आज दि. ०४/०६/२०२६ रोजी जिल्हाधिकारी, जालना यांना आमरण उपोषणाची पूर्वसूचना नोटीस दिली आहे. सदर नोटीस मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, , तहसीलदार व पोलीस प्रशासनालाही पाठवण्यात आली आहे.



**नागरिकांचे हाल, प्रशासनाचे दुर्लक्ष:**

बोरशे गुरुजी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून खालील गंभीर त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत: १. दोन्ही रस्त्यांची कामे अनेक महिन्यांपासून अर्धवट बंद आहेत.

२. नुकतेच केलेले डांबरीकरण जागोजागी उखडले असून मोठमोठे खड्डे पडत आहेत.

३. रस्त्याच्या बर्ममध्ये ( पंख्यामध्ये ) शासकीय नॉर्म्सप्रमाणे मुरूम न भरता काळी माती भरली आहे. सुरंगली-जळगांव रस्त्यावर बर्मचे ( पंख्याचे) काम केलेलेच नाही. ४. कामाच्या ठिकाणी कोणतेही माहिती फलक नसल्याने योजना, निधी, गुत्तेदार व जबाबदार अधिकारी यांची माहिती नागरिकांपासून लपवली जात आहे.

बोरशे गुरुजींचा आरोप:

''सदर कामे इस्टिमेट व शासकीय नॉर्म्सप्रमाणे झाली नसल्याचा दाट संशय आहे. कामे पूर्ण न होताच गुत्तेदाराला बिले अदा (पान २ वर)

# जेईएस महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

**जालना -प्रतिनिधी**

जे ई एस महाविद्यालय जालना येथे जागतिक पर्यावरण दिन प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून साजरा करण्यात आला. यावेळी जालना जिल्हा परिषदेचे माध्यमिक उपशिक्षण अधिकारी श्री काझी यांच्या हस्ते ही वृक्षाची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे, कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर तापडिया ,वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. मनीषा सुतार, प्रा समाधान पवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. अर्जुन सोनटक्के श्री धर्मेश आंबट, बबन जोशी आदिनी विशेष प्रयत्न केलेत.

# नागरिकांचे हित, कर्मचाऱ्यांचे हित, शहराचा केंद्रस्थानी ठेवून बेस्टचा आराखडा सादर करावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

बेस्टच्या सर्वांगीण पुनरुज्जीवनासाठी डेपो विकास, कर्मचारी निवासस्थानांची उभारणी, सार्वजनिक सुविधांची निर्मिती आणि दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबन यांचा समावेश असलेला महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात येत आहे. या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखून सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, मुंबई शहराच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये नागरिकांचे हित, कर्मचाऱ्यांचे हित आणि शहराचा दीर्घकालीन विकास या तीन प्रमुख बाबींना केंद्रस्थानी ठेवून बेस्टच्या आराखडा शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन बेस्ट उपक्रमाच्या विविध बस आगारांच्या आधुनिकीकरणासंदर्भात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महापालिकेच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, बेस्ट समितीच्या अध्यक्ष तृष्णा विश्वासराव, मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे, आमदार अमित साटम (व्हीसीव्दारे), नगरविकास (१) विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव ऊर्जा आभा शुक्ला, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.के. एच. गोविंदराज, महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, सचिव नवीन सोना, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन बेस्ट उपक्रमाच्या विद्यमान महाव्यवस्थापक डॉ. सोनिया सेठी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्यमंत्री यांचे गुंतवणुक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बेस्टचे संचालन ही केवळ एका संस्थेची नव्हे तर मुंबई शहर, महानगरपालिका आणि राज्य शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे बेस्टच्या भविष्यासंदर्भात सर्व सहभागी शासकीय व अशासकीय संस्था यांचा संवाद असणे अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने विविध विभाग आणि संस्थांना एकत्र आणून व्यापक चर्चा करण्यात आली. बेस्टच्या डेपो परिसरांचा विकास दोन टप्प्यात करण्यात येईल. भविष्यात बस ताफ्याची क्षमता टप्प्याटप्प्याने वाढविण्याचे नियोजनही करण्यात येणार आहे.

बेस्टच्या जमिनी विकणार नाही

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, या विकास प्रक्रियेत बेस्टच्या मालकीच्या जमिनी विकल्या जाणार नाहीत. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर वित्तीय भागीदारांच्या मदतीने या जागांचा विकास केला जाईल. जमीन आणि मालमत्तेची मालकी बेस्टकडेच राहणार असून दीर्घकालीन भाडेपट्टा मॉडेलद्वारे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. मुंबईकरांना परतावा देणारा विकास हा या प्रकल्पाचा मुख्य गाभा आहे. प्रत्येक डेपोचा विकास केवळ व्यावसायिक उपयोगापुरता मर्यादित न ठेवता तेथे संग्रहालये, क्रीडा सुविधा, सांस्कृतिक उपक्रम आणि इतर सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्याचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकल्प शहराच्या सामाजिक जीवनाला चालना देणारा ठरेल. याच अनुषंगाने निवडक डेपोमध्ये मराठी चित्रपटांसाठी समर्पित ३०० ते ४०० आसनक्षमतेची चित्रपटगृहे उभारण्याच्या संकल्पनेचाही विचार करण्यात यावा. अशा चित्रपटगृहांमध्ये मराठी चित्रपटांना सवलतीच्या दरात स्क्रीन उपलब्ध करून देता येतील. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या जीवनमानाचा विचार करून आधुनिक निवासी संकुलांची देखील उभारणी करण्यात यावी.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'विकसित भारत २०४७ मध्ये 'विकसित महाराष्ट्र' या संकल्पनांच्या पार्श्वभूमीवर मुंबई २०४७ चे नियोजन करा.बेस्टच्या पुढील २२ वर्षांच्या गरजांचा सखोल अभ्यास करावा. भविष्यातील बस संख्या, कर्मचारी आवश्यकता, महसूल आणि खर्च यांचा विचार करून दीर्घकालीन आर्थिक आराखडा तयार करण्यात यावा. आर्थिक आणि तांत्रिक क्षमता असलेल्या संस्थांनाच काम करण्यासाठी संधी दिली जावी. प्रकल्प मंजुरी (पान २ वर)

# नीट परीक्षा पारदर्शक, सुरळीत व तणावरहित वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी नीट परीक्षेच्या पूर्व तयारीसंदर्भात आयोजित बैठक झाली. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्त शिरीष जैन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सहसचिव संतोष खोरगडे, राज्य सूचना विज्ञान अधिकारी सपना कपूर, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून त्याचे नियंत्रण करावे, तसेच सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. परीक्षा केंद्रांवर उमेदवारांची तपासणी व ओळख पडताळणी प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी. परीक्षेसंदर्भातील अचूक माहिती विद्यार्थी, पालक आणि नागरिकां पर्यंत पोहोचविण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी वापर करून व्यापक जनजागृती करण्यात यावी, तसेच परीक्षा प्रक्रियेबाबत अफवा किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित झाल्यास त्याचा तातडीने खुलासा करून विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मानत कोणताही संभ्रम निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी.

पुणे आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे, परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, याची दक्षता घेण्याबरोबरच सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, पावसाच्या दृष्टीने पूर्वतयारी आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करून परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस विभाग, शिक्षण विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय (पान २ वर)

# महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाण्यांचे वितरण; शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावेत -कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे. योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ''राज्यातील शेतकऱ्यांना वेळेत आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी विभागाने महाडीबीटी पोर्टलवरून बियाणे वितरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे बियाणे वाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि वेग येणार आहे. शेतकऱ्यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा.''

ते म्हणाले, ''खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवस्थेच्या माध्यमातून कृषी सेवा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन खरीप हंगामाची तयारी वेळेत पूर्ण करावी.'' महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांनी संकेतस्थळावर जाऊन ''बियाणे वितरण, प्रात्यक्षिके, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते'' या शीर्षकाअंतर्गत अर्ज करावेत. अर्ज प्रक्रियेसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे आवश्यक आहे. (पान २ वर)

# पाणीपुरवठा व समाज सेवेमधील योगदान आजही जनता विसरलेली नाही, मानव सेवा मंडळातर्फे सर्जेराव शिंदे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**दत्ता देशमुख**

जालना जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता तथा माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव विठोबा शिंदे ३१ मे २०२६ रोजी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने टेंभुर्णी येथील मानव सेवा मंडळातर्फे त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला. सर्जेराव शिंदे यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून जनसेवेचा वसा घेतला. तसेच कार्यकारी अभियंता पदावर काम करताना त्यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात



**लोकाभिमुख कामाला प्राधान्य**

शिंदे साहेबांनी प्रशासकीय सेवेत असताना नेहमीच लोकाभिमुख कामाला प्राधान्य दिले. पाण्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्यांनी संवेदनशीलतेने काम केले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे सामाजिक कार्यातील मार्गदर्शन आम्हाला लाभेल. सर्जेराव शिंदे यांचे काम हे आजही जनता विसरलेली नाही आणि इथून पुढेही विसरणार नाही. सेवाभावी वृत्तीने काम करण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केलेली असल्यामुळे गावाला त्यांच्या मार्गदर्शनाची अत्यंत गरज आहे.

**- उपस्थित मान्यवर**

अनेक गावांना शुद्ध पाणीपुरवठा योजना आणि जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी यांसारखी कामे मार्गी लागली. सत्कार सोहळ्याला मानव सेवा मंडळाचे पदाधिकारी नसीम शेख, संजय निकम, सुनील अंभोरे, संजय राऊत, फैसल चाऊस, ज्ञानेश्वर उखर्डे, अलकेश सोमाणी, बालाजी मगर, डी. आर. मुनेमाणिक, गजानन डोमळे आदी उपस्थित होते. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी सर्वांचे आभार मानून पुढील काळातही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याची ग्वाही दिली.



जालना अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मी कसा घडलो या विषयावर व्याख्यान देताना विधान परिषदेचे सभापती ना राम शिंदे व्यासपीठावर खासदार रामराव वडकुते, आ अर्जुन खोतकर,दीपक बोऱ्हाडे, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अध्यक्ष पंडितराव ताडेगावकर,सचिव सुनंदा बनसोड आदी छाया/जावेद तंबोली

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.